# DMK JAOLI BANK
## दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.

(नोंदणी क्र. बी. ओ. एम. / बी. एन. के. / १२७ ऑफ १९७३)
प्रशासकीय कार्यालय : ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई-४०० ००४.
दूर. क्र.: +९१ २२-२३८२२७७७/ +९१ २२ २३८७०४३७. फॅक्स : +९१ २२-२३८५०५१४
Website: www.jaolibank.in Email ID : hoadmin@jaolibank.in, hoscr@jaolibank.in


## ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांनी दि. २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी नागरी सहकारी बँकांना वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याबाबत निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (सुधारीत) अन्वये बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २६.०३.२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता बँकेचे मुख्यालय ४१८/२०, मौलाना आझाद रोड, मुंबई-४००००४ येथे व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Means) द्वारे आयोजीत करण्यात आलेली असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. सदर सभेस सर्व सभासदांनी ऑनलाईन उपस्थित रहावे. ही विनंती.

### ❖ सभेपुढील विषय ❖

१. दिनांक ३० जून, २०१९ रोजी संपन्न झालेल्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाचा दि. २ नोव्हेंबर, २०२० रोजीचा आध्यादेश क्र.१८ नुसार बँकेच्या संचालक मंडळास प्राप्त झालेले अधिकार व देण्यात आलेल्या मंजुरीनुसार

अ) दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणीत केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास कार्योत्तर मान्यता देणे.

ब) संचालक मंडळाने मंजुर केल्याप्रमाणे सन २०१९-२० सालच्या करण्यात आलेल्या नफा विभागणीस कार्योत्तर मान्यता देणे.

क) संचालक मंडळाने मंजुर केल्याप्रमाणे सन २०२०-२१ सालच्या अंदाजपत्रकास कार्योत्तर मान्यता देणे.

ड) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या मे. यार्दी प्रभु अँड असोशिएटस् (एल एल पी) या वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे.

३. सन २०१९-२० चा वैधानिक लेखा-परिक्षकांचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.

४. माहे ३१ मार्च, २०२० अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जांची नोंद घेणे.

५. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे,

६. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीत कर्जदारांकडुन करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधीत ठेऊन निर्लेखन करण्यास मान्यता देणे.

७. भारतीय रिझर्व बँक व सहकार खात्याचे परवानगीस अधिन राहून बँकेच्या वाशी शाखेकरीता सद्य स्थितीतील भाडेतत्वावरील जागा खरेदी करणे व स्वमालकीच्या जागेची विक्री करणेस मान्यता देणे.

८. बँकेने तयार केलेल्या कर्मचारी आकृती बंध (स्टाफिंग पॅटर्न) ला मंजुरी देणे.

९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे दुरुस्तीस मान्यता देणे,

१०. दि.१८ डिसेंबर, २०२० रोजीच्या संचालक मंडळाचे सभेत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परवानगीस अधिन राहुन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी (Chief Executive Officer) श्री एस रंगनाथन यांचे नियुक्तीचे अनुषंगाने पारीत करण्यात आलेल्या ठरावास मान्यता देणे.

११. व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Means) द्वारे आयोजीत वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे,

१२. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे संमतीने**
**एस. रंगनाथन**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ११.०३.२०२१**

Scanned by CamScanner

# विशेष सुचना:

१. व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Means) द्वारे आयोजीत करण्यात आलेल्या बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक वर दि. दि. १९.०३.२०२१ पर्यंत या सुचना पत्रासह लॉगीन करीता लिंक पाठविण्यात येईल.

२. इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन वर लॉगीन लिंक डाऊनलोड करुन त्या द्वारे सभासद या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील,

३. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया दि. २६.०३.२०२१ रोजी पुर्ण होईल. त्याबाबत अधिक तपशील खालील प्रमाणे आहे;

अ) दि.२६.०३.२०२१ रोजी सभेच्या निर्धारीत वेळेपुर्वी १५ मिनिटे आधी म्हणजे १०.१५ पासुन लॉगीन लिंक चालू करण्यात येईल.

ब) दि.२६.०३.२०२१ रोजी सर्वप्रथम सभेच्या विषय पत्रिकेतील विषय सभेपुढे मांडण्यात येतील.

क) सभेच्या विषय पत्रीकेतील ठराव मंजुरीबाबतचा निर्णय लिंकवर/संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल.

४. मा. सहकार खात्याने निर्गमीत केलेल्या दि. २५.०२.२०२१ रोजीच्या पत्रानुसार व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Mean) द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सुचना केलेली आहे. त्या अनुषंगाने, बँकेने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझीटरी लिमिटेड (NSDL) यांची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. काही अनपेक्षीत परिस्थीतीत उदा. तांत्रीक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास तांत्रीक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज सुरु केले जाईल याची सभासदांनी नोंद घ्यावी.

५. सभासदांना लॉगीन लिंकबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास evoting@nsdl.co.in या ई-मेल आयडीवर अथवा १८००-१०२०-९९०/१८००-२२-४४-३० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यांचेकडुन सदर बाबत काही प्रश्न/अडचणी असतील तर त्या सोडविल्या जातील. सभासदांच्या इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील तर त्या सोडविणे शक्य होणार नाही. तसेच सभासदांना बँके संदर्भात अथवा विषय पत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्यांचे निराकरण या एजन्सीमार्फत दिलेल्या दुरध्वनी क्रमांक व मेल आयडीवर होणार नाही.

६. सभेच्या नियोजीत वेळेत म्हणजेचे सकाळी १०.३० वाजेपर्यंत गणपुर्ती न झाल्यास सभा तहकुब केली जाईल व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी व्हीडीओ कॉन्फरंसिंग (VC)/ओएव्हिएम (Other Audio Visual Mean) द्वारे सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणपुर्ती व वेगळ्या सुचनेची आवश्यकता राहणार नाही. जेवढे सभासद बँकेने या सर्वसाधारण सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजतांना त्यावेळी ग्राह्य धरली जाईल.

७. सन २०१९-२० चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, उपविधी दुरुस्तीचा मसुदाबँकेच्या वेबसाईट www.jaolibank.in वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

८. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या शाखांमध्ये दिनांक १२.०३.२०२१ पासुन उपलब्ध राहील.

९. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत विधायक स्वरुपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि.१९.०३.२०२१ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरुपात अथवा hoscr@jaolibank.in केवळ या ई-मेलवर आयडी वर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे भोगीचे होईल.

Scanned by CamScanner